जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 APR २०२१

लोकमत



बी. एस. पाटील लिखित 'मुसाफिर हूँ यारो' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले.

# बी. एस. पाटील यांचे लेखन हृदयस्पर्शी : डॉ. माणिकराव साळुंखे

## 'मुसाफिर हूँ यारो'चे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी वित्त व लेखाधिकारी बी. एस. पाटील यांचे हृदयस्पर्शी आणि

प्रवाही लेखन वाचकांना भावते, असे उद्गार विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी मंगळवारी काढले. भूगोल अधिविभागांतर्गत असलेल्या पर्यटन आणि प्रवास सुविधा केंद्राच्यावतीने डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते बी. एस. पाटील लिखित मुसाफिर हूँ यारो या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. साळुंखे म्हणाले, या पुस्तकामध्ये विविध विषयांवर लेखन झालेले आहे. ऐतिहासिक घडामोडींची

माहिती करून घेण्याबरोबरच जीवनातील तणाव सहलीच्या माध्यमातून कमी करण्यासाठी या पुस्तकाचे वाचन करणे महत्वाचे ठरेल. डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, या पुस्तकामध्ये उत्तम प्रवासवर्णनाबरोबरच

हळवेपणा आणि संवेदनशीलता प्रकर्षाने दिसून येते. लेखक बी. एस. पाटील, डॉ. अरुण भोसले, चंद्रकांत कुंभार, अशोक पट्टणशेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. मीना पोतदार यांनी प्रास्ताविक केले. भाग्यश्री पाटील यांनी आभार मानले.

यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, उपकुलसचिव लेखा प्रिया देशमुख, मुख्य लेखापाल दुर्गाली गायकवाड, अजित चौगुले, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते.

09 APR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जीवनातील तणाव कमी करणारे 'मुसाफिर हूँ यारो' : माणिकराव साळुंखे

## बी. एस. पाटील लिखित पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. ८ : 'ऐतिहासिक घडामोडींची माहिती करून घेण्यासह जीवनातील तणाव सहलींच्या माध्यमातून कमी करण्यासाठी 'मुसाफिर हूँ यारो' या पुस्तकाचे वाचन करणे महत्त्वाचे ठरेल. आनंददायी प्रवास, विविध ठिकाणांच्या सहलींच्या माहितींचे अभ्यासपूर्ण संकलन या पुस्तकाचे वैशिष्ट आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे माजी वित्त व लेखाधिकारी बी. एस. पाटील यांनी केलेले हृदयस्पर्शी, प्रवाही लेखन वाचकांना भावते', असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी आज येथे केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'मुसाफिर हूँ यारो' या पुस्तकाचे प्रकाशन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून मीना पोतदार, व्ही. एन. शिंदे, बी. एस. पाटील, पी. एस. पाटील, भाग्यश्री कासोटे-पाटील उपस्थित होत्या.

विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागांतर्गत असलेल्या पर्यटन आणि प्रवास सुविधा केंद्रातर्फे आयोजित या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. पदार्थविज्ञान अधिविभागाच्या सभागृहामधील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

याप्रसंगी बी. एस. पाटील, डॉ. अरुण भोसले, चंद्रकांत कुंभार, अशोक पट्टणशेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, उपकुलसचिव प्रिया देशमुख, दुर्गाली गायकवाड, अजित चौगुले, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. अवनीश पाटील, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 APR 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने बुधवार, दि. ९ एप्रिलपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. ९ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये सप्ताहाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रा. दत्ता भगत लिखित 'भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान' ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. प्रा. डॉ. गिरीश मोरे व प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांची व्याख्याने होणार असून, प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील हे अध्यक्षस्थानी असतील.

दि. १० रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य' या विषयावर डॉ. नितीन रिंढे (मुंबई) यांचे व्याख्यान होईल. दि. ११ रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त 'महात्मा ज्योतिराव फुले यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य' विषयावर डॉ. श्यामसुंदर मिरजकर (मायणी) यांचे व्याख्यान होणार आहे. दि. १२ रोजी 'लघुपट सादरीकरण व चर्चा' मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे. चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. दि. १३ रोजी 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य' विषयावर ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पचिंद्रे यांचे व्याख्यान सकाळी १०.३० वाजता ऑनलाईन प्रसारित होणार आहे.

दि. १४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त प्रा. डॉ. डी. टी. शिर्के कुलगुरू व प्रा. डॉ. पी.. एस. पाटील प्र- कुलगुरू यांच्या हस्ते सकाळी १० वाजता प्रतिमापूजन करून अभिवादन कार्यक्रम होईल. त्यानंतर राजर्षी शाहू सिनेट सभागृहात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य' या विषयावर अमिटी विद्यापीठाचे उपप्र-कुलगुरू डॉ. गौतम गवळी यांचे व्याख्यान होईल.

विविध कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक व अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 APR 2025

पुण्यनगरी



# पर्यावरण संदेश घेऊन कोल्हापूरचे तिघे भूतानला

**कोल्हापूर :** पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी कोल्हापूरचे तिघे सोमवारी भूतानला रवाना झाले आहेत. 'निसर्ग वाचवा, जीवन वाचवा' तसेच 'ऑक्सिजनचा सन्मान करा आणि झाडांचाही सन्मान करा' हा संदेश देणार आहेत. यामध्ये माजी जि.प. सदस्य प्रताप कोंडेकर, प्रकाश डोंगरकर, नंदकिशोर भोसले-पाटील यांचा समावेश आहे. सोमवारी (दि. ७) सकाळी शिवाजी विद्यापीठ येथून छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करून त्यांच्या प्रवासाची सुरवात झाली. तब्बल २५ दिवस ते विविध ठिकाणी हा संदेश देणार आहेत. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पर्यावरण महत्त्व सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रवाससंदर्भात, तर डॉ. संदीप पाटील यांनी आरोग्य व निसर्ग यासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी शंकर पाटील, राजीव लिंग्रस, डॉ. हिराणी, डी. डी. शिंदे, डी. वाय. कदम, शशिकांत पाटील, आर. के. पाटील, सुभाष मालू, मोहन पटेल, गिरीश जोशी, एन. जी. सावंत, धनाजी भोसले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 APR 2025
पुढारी

# विद्यापीठ परीक्षेला २५,९६५ विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला २५ हजार ९६५ विद्यार्थी उपस्थित होते. मंगळवारी बीए., बी. कॉम., बी. व्होक व ऑक्टोबर-नोव्हेंबर सत्रातील बी. फार्मसी, एम. फार्मसी यासह विविध ४८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १६४ परीक्षा केंद्रांवर सुरळीत झाल्या. दि. ८ रोजी भरारी पथकाकडून कोल्हापुरात २७, सांगलीत १४ व सातारा जिल्ह्यातून ३ अशा ४४ गैरप्रकारांची नोंद करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 APR 2025

तरुण भारत



कोल्हापूर : न्यू कॉलेजमधील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. अशोक भोईटे. सोबत डॉ. के. जी. पाटील, डी. जे. किल्लेदार, डॉ. व्ही. एम. पाटील आदी.

# संकटांना संधी समजून प्रत्येक विद्यार्थ्याने जीवनात यशस्वी व्हावे

- शिवाजी विद्यापीठ माजी प्र-कुलगुरू डॉ. अशोक भोईटे

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

'टाकीचे घाव सोसल्याशिवाय जसे दगडास देवपण मिळत नाही, तसे कष्टाशिवाय जीवनात यश मिळत नाही त्यामुळे संकटाला संधी समजून विद्यार्थ्यांनी यशस्वी व्हावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. अशोक भोईटे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाचा 'आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार प्राप्त' शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस चेअरमन डॉ. के. जी. पाटील होते.

स्वागत प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. क्रीडा विभाग प्रमुख प्राध्यापक प्रा. अमर सासने यांनी वर्षभरात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे अहवाल वाचन केले. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त श्रीधर निगडे, अफ्रिन अख्तर, वैष्णवी पाटील या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार तसेच पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

संस्थेचे व्हाईस चेअरमन डी. जे. किल्लेदार, खजानीस वाय. एस. चव्हाण, संचालक डॉ. पी. के. पाटील, पी. सी. पाटील, वाय. एल. खाडे, एस. जे. मेटिल, जुनिअर महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. एस. जी. जगताप, पर्यवेक्षक प्रा. एम. बी. गडदे, प्रबंधक एम. वाय. कांबळे आदी उपस्थित होते. आभार डॉ. निलेश पवार यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. सर्जेराव पाटील, प्रा. श्रीमती यु. के. गायकवाड, डॉ. एम. ए. नायकवडी यांनी केले.

09 APR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्यायदान प्रक्रिया मूल्याधारित एआयचा वापर सुटसुटीत करेल

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड देत मूल्यवर्धित शैक्षणिक अभ्यासक्रमांची नितांत आवश्यकता आहे. मूल्यांवर आधारित ए. आय. तंत्रज्ञानाचा वापर न्यायदान प्रक्रिया अधिक सुटसुटीत करेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शहाजी विधी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा, विविध विषयात, परीक्षेत प्रथम क्रमांक नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते.




**कोल्हापूर : शहाजी लॉ कॉलेजमधील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. विश्वनाथ मगदूम, डॉ. प्रवीण पाटील आदी.**

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, समाजामध्ये बेरोजगारी, गुन्हेगारी वृत्ती आणि मानसिक तणाव वाढत चालला आहे. कायद्याचं ज्ञान समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचविणे हे विधी विद्यार्थ्यांचं कर्तव्य आहे. विविध शैक्षणिक अभ्यासक्रम यांच्याशी सांगड घालून ज्ञानदानाचे चळवळ गतिमान करणेची निकड आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे जोड देऊन न्यायदान प्रकिया सुटसुटीत केली पाहिजे. काऊन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम म्हणाले, आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश आणि मराठी माध्यमातून आयोजन केलेल्या अभिरुप न्यायालयाच्या स्पर्धा या कौतुकास पात्र आहेत. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, डॉ. प्रसाद मगदूम, ॲड. वैभव पेडणेकर, ॲड. अमित बाडकर यांनी परिश्रम घेतले. प्रा. सुहास पत्की, प्रा. सुचिता सुरगीहल्ली, प्रा. अतुल जाधव , प्रा. विक्रम इराले, प्रा. दीप्ती पाटील, प्रा. शिवभूषण जाधव, प्रा. तन्वी मिस्कीन, प्रा. सदिया मुल्ला आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 APR 2025

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षेत ४४ गैरप्रकार उघडकीस

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च–एप्रिल २०२४–२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बी. ए., बी. कॉम., बी. फार्मसी, एम. फार्मसी अशा ४८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. १६४ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. ही परीक्षा २५ हजार ९६५ विद्यार्थ्यांनी दिली.

भरारी पथकाकडून कोल्हापूर २७, सांगली १४ आणि सातारा ३ अशा ४४ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीकडे केली आहे. या विद्यार्थ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे, तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधिन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.